लोकमत




शिवाजी विद्यापीठाने प्रा. एन. डी. पाटील यांना २००९ साली डी. लिट. पदवी देऊन त्यांचा गौरव केला. विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला.

लोकमत




कोल्हापुरात १२ जानेवारी २०१९ ला शिवाजी विद्यापीठातर्फे ज्येष्ठ नेते प्रा. एन. डी. पाटील यांचा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते माजी कुलगुरू रा. कृ. कणबस्कर स्मृती पुरस्कार देऊन शानदार समारंभात सत्कार करण्यात आला.

पुढारी

# कृतिशील, प्रबोधक नेतृत्व हरपले

प्रा. पाटील यांच्या निधनाने विवेकनिष्ठ, निःस्पृह विचारवंत, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील कृतिशीलतेने तळपणारे खंदे प्रबोधक नेतृत्व गमावले. विद्यापीठाचा महान मार्गदर्शक, हितचिंतक काळाच्या पडद्याआड गेला आहे.

**- प्रा. डॉ. डी. टी. शिर्के,**

कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

पुढारी




शिवाजी विद्यापीठाच्या ४२ व्या दीक्षांत समारंभात प्रा. एन. डी. पाटील यांना डी.लिट. पदवी बहाल करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

पुढारी

# व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी उद्यापर्यंत अर्जाची मुदत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाने ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२१ हिवाळी सत्रातील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षेचे परीक्षा अर्ज भरण्याच्या सुधारित तारखा जाहीर केल्या आहेत. त्यानुसार विद्यार्थ्यांना महाविद्यालय, पदव्युत्तर अधिविभागात १९ जानेवारीपर्यंत अर्ज करता येणार आहे.

विद्यापीठ हिवाळी सत्र परीक्षांसाठी अर्ज भरण्यास १५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. तथापि, व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षाकरिता प्रवेशप्रक्रिया उशिरा सुरू झाली. त्यामुळे काही विद्यार्थी परीक्षा अर्ज भरू शकले नाहीत. त्यासाठी



शिवाजी विद्यापीठातून...

मुदतवाढ देण्यात आली आहे. महाविद्यालय, पदव्युत्तर विभागांनी ऑनलाईन अर्ज दि. १९ पर्यंत अप्रुव्ह करावयाचे आहेत. त्यानंतर महाविद्यालयांनी विद्यापीठामध्ये २० जानेवारीपर्यंत परीक्षा अर्जाच्या याद्या सादर करणे आवश्यक आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी पत्रकाद्वारे दिली.

18 JAN 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर










१) टोलविरोधी आंदोलनातील उद्रेक.

२) सन २०१९ मध्ये प्राचार्य आर.के. कणबरकर पुरस्काराने प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांना सन्मानित करताना शरद पवार.

३) वीज दरवाढविरोधी आंदोलन करताना.

४) सन २००६ मध्ये शिवाजी विद्यापीठाची डी.लिट. पदवी प्रदान

५) मलकापूर येथील महाविद्यालयास प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांचे नाव देण्यात आले.

६) प्रा.डॉ. एन. डी. पाटील आणि सरोजताई पाटील यांना शरद प्रतिभा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.





तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाचे मार्गदर्शक काळाच्या पडद्याआड

ज्येष्ठ नेते डॉ. एन. डी. पाटील यांच्या निधनामुळे महाराष्ट्राने अत्यंत विवेकनिष्ठ, नि:स्पृह विचारवंत आणि सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कणखर कृतीशीलतेने तळपणारे खंदे प्रबोधक नेतृत्व गमावले आहे. त्यांच्या रुपाने शिवाजी विद्यापीठाचा महान मार्गदर्शक व हितचिंतक काळाच्या पडद्याआड गेला आहे. त्यांच्या निधनामुळे शिवाजी विद्यापीठ परिवार एका महान मार्गदर्शक व हितचिंतकास मुकला आहे,

**डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू,**
**शिवाजी विद्यापीठ**

तरुण भारत

**• शैक्षणिक क्षेत्रातील कार्य**


शिवाजी विद्यापीठ - पहिल्या सल्लागार समितीचे सदस्य १९६२
विद्यापीठ - सिनेट सदस्य १९६५
विद्यापीठ - कार्यकारिणी सदस्य १९६२-१९७८
विद्यापीठ - सामाजिकशास्त्र विभागाचे डीन १९७६-१९७८
सदस्य, प्राथमिक शिक्षण आयोग, महाराष्ट्र राज्य १९९१
रयत शिक्षण संथेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य- १९५९ पासून
रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन - १९९० पासून
दक्षिण महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ , बेळगाव अध्यक्ष - १९८५ पासून

तरुण भारत

◆ सन्मान / पुरस्कार

भाई माधवराव बागल पुरस्कार - १९९४
स्वामी रामानंदतीर्थ विद्यापीठ,नांदेड - डी.लीट.पदवी, १९९९
राष्ट्रीय बियाणे महामंडळ ( अध्यक्षपद )भारत सरकार - १९९८ - २०००
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ - डी.लीट. पदवी, २०००
विचारवेध संमेलन ,परभणी अध्यक्षपद- २००१
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - डी.लीट.पदवी
शाहीर पुंडलिक फरांदे पुरस्कार

जनसंपर्क कक्ष
18 JAN 2022 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर




शिवाजी विद्यापीठाची डी-लिट पदवी तत्कालीन कुलगुरु डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या हस्ते स्वीकारताना डॉ. एन. डी. पाटील.